# श्री स्वामी समर्थ- सुप्त मठ

डॉ.तुषार सावडावकर

देवळांच्या गावा...

महाराष्ट्रात आणि खुद्द मुंबईतही श्री स्वामी समर्थांचे बरेच मठ आहेत. दादरचा श्री बाळकृष्ण महाराज यांचा 'स्वामी मठ', श्री स्वामीसूत यांचा गिरगावातल्या कांदेवाडीमधला श्री स्वामी समर्थ मठ, श्री कृष्णाबुवा तथा ठाकूरदासबुवा यांचा ठाकूरद्वारचा श्री स्वामी मठ, कमलाकरपंत वालावलकर यांचं अंधेरी, चार बंगला इथलं श्री स्वामी समर्थ मंदिर, श्री स्वामीसूत यांच्या कन्या सिद्धाबाई यांचा चेंबूरचा श्री स्वामी समर्थ मठ आदींचा समावेश होतो. इत्यादी सर्व मठ प्रसिद्ध असून बऱ्याच स्वामी भक्तांची इथे दर्शनासाठी अलोट गर्दी असते मात्र मुंबईतला एक जुना मठ लोकांना अद्याप फारसा माहीत नाही. हा मठ भुलाभाई देसाई मार्ग, मफतलाल पार्कच्या मागे व महालक्ष्मी मंदिराजवळ वसलेला आहे. या मठाची स्थापना सरदार विनायक वासुदेव आगासकर यांनी केली.

ब्रिटिश साम्राज्ञी क्वीन व्हिक्टोरियाच्या राज्यारोहणाची ज्युबिली साजरी करण्याकरिता, इंग्रज सरकारने त्याकाळी जाहिरनामा प्रकाशित केला होता. ज्युबिली महोत्सव देशाच्या सर्व प्रेसिडेन्सीजमध्ये साजरे व्हावे म्हणून फर्मान काढले होते. जाहीरनामा इंग्रजीत असल्यामुळे सर्वसामान्य हिंदी माणसाला समजावा म्हणून अनेक भाषांमध्ये याचं भाषांतर करण्याचं ठरलं.

इंग्रज सरकारने त्यावेळेचे चीफ ओरिएण्टल ट्रान्सलेटर सरदार विनायक वासुदेव आगासकर यांच्यावर भाषांतराची जबाबदारी सोपविली. आगासकरांनी तत्काळ मराठी, मारवाडी, गुजराथी, हिंदी भाषेत त्या इंग्रजी जाहीरनाम्याचं भाषांतर करून दिलं. भाषांतराच्या सर्व प्रती प्रेसिडेन्सीजमध्ये सर्व प्रांतात व सर्व संस्थानांत वाटण्यात आल्या.

इंग्रज सरकारने मुंबईच्या सेंट्रल लायब्ररीमध्ये प्रतिष्ठित नागरिकांची व सर्व प्रतिनिधींची सभा बोलावली. सरदार आगासकरांनी सर्वांसमक्ष, गव्हर्नराच्या उपस्थितीत भाषांतरीत जाहीरनामा वाचून दाखवला. त्या वाचनाबद्दल व मेहनतीबद्दल, गव्हर्नरांनी खूष होऊन सरदार विनायक आगासकरांना महालक्ष्मीजवळची काही जमीन बक्षीस म्हणून बहाल केली.

आगासकर स्वामी भक्त होते. ते अक्कलकोटला गेले असताना श्री स्वामी समर्थांनी त्यांना 'दर्याकिनारी बसून आनंद कर जा', अशी आज्ञा केली. त्यांच्या पत्नीला 'पत्थरावर पैसे टाक' अशी आज्ञा केली. याचाच अर्थ 'पादुका स्थापन कर', असा होता. आयुष्याच्या अखेरीस विनायकराव थकले असताना, श्रींनी त्यांना अक्कलकोटला येण्याची जरूरी नाही असं सांगून मुंबईचे रावसाहेब ढवळे यांच्यामार्फत पादुका पाठवल्या.



विनायकरावांनी चौपाटी किनाऱ्यावर पूर्वाभिमुख छोटं संगमरवरी मंदिर बांधलं. या मंदिरात स्वामींच्या आत्मलिंग पादुका एका चांदीच्या डब्यात ठेवल्या आहेत. मंदिराचा दरवाजा पश्चिमाभिमुख असून दरवाज्यासमोर छानसं तुळशीवृंदावन आहे. मंदिराच्या पूर्वेला समुद्र असून वास्तूशास्त्रानुसार अतिशय योग्य पद्धतीने मंदिराची रचना केली आहे. इथे येणाऱ्या प्रत्येक भक्ताला एक वेगळी अनुभूती येते. श्री स्वामींची जयंती तसंच पुण्यतिथी या मठात साजरी केली जाते. हा मठ पूर्णतः खासगी आहे.

mtartedit@gmail.com